# आमच्या गावात आम्हीच सरकार - बनायचं तर ?

भारताने वर्ष १९९३ नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधून एक शांत स्वरूपात सुरू झालेली विकेंद्रीकरणाची क्रांती अनुभवली आहे. समाजातील वंचित समाज समुहांसोबतच महिलांच्या आरक्षणामुळे गावस्तरावरील दुर्लक्षित नेतृत्वालाही नव संधी मिळाली आहे.

आज महाराष्ट्रामध्ये आजमितीस एकूण २८,००६ ग्रामपंचायती कार्यरत असून त्यात सुमारे १,९७,३३८ ग्रामपंचायत सदस्य आहेत. ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर पंचायतराज संस्थांकडे राज्य शासनाने विविध योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी सोपवली आहे. ग्रामसेवकराज संपून जनतेच राज्य गावात यायचं  तर जनतेचे प्रतिनिधीच सक्षम बनले पाहिजेत!

ग्रामपंचायतस्तरावर लोकशाही पद्धतीने निवडून आल्यानंतर करावयाच्या कामकाजाची माहिती घेऊन आपल्या पदाला शोभेल असे काम करणे हे लोकप्रतिनिधींसमोर एक महत्त्वाचे आव्हान असते. यात ग्रामसेवकांच्या मदतीने ग्रामपंचायतीचे आर्थिक व्यवहार करणे, गाव विकास आराखडा तयार करणे, केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध योजना, निर्णय व कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, कर गोळा करणे, ग्रामसभा घेणे, मासिक सभा, ग्रामपंचायतीचे विविध रेकॉर्ड ठेवणे, ग्रामसभांमध्ये व विकास प्रक्रियेत लोकांची भागीदारी वाढविणे इत्यादी कामे ग्रामपंचायतस्तरावरील लोकप्रतिनिधींना करावी लागतात.

लोकप्रतिनिधी म्हणून लोकांप्रती असलेल्या जबाबदाऱ्या व भूमिका, मानवी मूल्यांची पाठराखण करणे, समानता, बंधुता, भगिनीभाव, परस्पर सन्मान, विविधतांचा आदर, या विविध मूल्यांची जोपासना करताना लोकप्रतिनिधी समाजावर वेगळी छाप पाडत असतात. तसेच समाजातील उतरंडी, भेदाभेद, वंचित व समृद्ध समूह त्यांचे आपापसातील मतभेद, महिला व पुरूषांमधील असलेला ऐतिहासिक फरक व भेद, जातीभेद, धार्मिक सलोखा व तेढीचे प्रसंग अशा व्यापक मुद्यांवर या लोकप्रतिनिधींना महत्वाची भूमिका निभवावी लागते.

ग्रामपंचायतीत लोकप्रतिनिधी म्हणून नियुक्त झाल्यावर कारभार परिचय व्हायला हवा म्हणजेच त्यांची सन्मानाने त्यांची गावाला ओळख होणे, कारभार सुरू होण्यासाठी त्यांना शुभेच्छा देणे, त्यांना ओळखपत्र देऊन, त्यांच्या कामाची नेमकी ओळख करून देणे, ही सर्व कामे त्यांनी पदभार स्वीकारल्यावर ताबडतोब होणे आवश्यक असते.

राज्य शासनाचे , स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या सर्व लोकनियुक्त प्रतिनिधींसाठी "कारभार परिचय (इंडक्शन) धोरण" असायला हवे. ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या सर्व लोकनियुक्त प्रतिनिधींना किमान तीन महिन्याच्या आत "कारभार परिचय (इंडक्शन) प्रशिक्षण" देण्याची योजना राज्य शासनाने तयार करावी . ग्रामपंचायतीत सरपंच म्हणून पदभार स्विकारल्यानंतर

औपचारीक बैठक व्यवस्था, नेमप्लेट, सरपंच रबर स्टँप, डिजिटल सही, लेटर हेड, ओळखपत्र, निवडून आल्याचे प्रमाणपत्र असा "समग्र प्रशासकीय संच" सन्मानाने

सरपंचांना मिळायला हवा. या धोरणामुळे नेमकं काय होईल ते समजून घेऊ या.

नवनियुक्त सदस्यांची ग्रामपंचायत अस्तित्वात आल्यावर पदभार स्विकारतांना गावस्तरावर "लोकप्रतिनिधींचा शपथ ग्रहण सोहळा" आयोजित होईल. नव नियुक्त ग्रामपंचायत सरपंच व सदस्यांनी पदभार स्विकारल्यानंतर त्यांना गावस्तरावरील "शासकीय व निमशासकीय यंत्रणा व कर्मचारी परिचय" कार्यक्रमाचे आयोजन होईल. स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडून येणाऱ्या प्रत्येक लोकप्रतिनिधींना त्यांची कर्तव्ये, अधिकार आणि त्यांना मिळणाऱ्या सेवा-सुविधा तसेच भत्ते व मानधनाविषयी माहिती तसेच पंचायत कारभाराची सोप्या भाषेत

ग्रामपंचायतीचे ३एफ (फंक्शन, फायनान्स आणि फंक्शनरीज) "पंचायत प्रशासन मार्गदर्शिका (मॅन्युएल)" दिले जाईल. राष्ट्रीय दिनांच्या दिवशी "ध्वजवंदनाचा संविधानिक अधिकार" धोरण म्हणून सरपंचाना देण्यात येईल. ग्रामपंचायत सरपंच व सदस्यांना समान "बैठक भत्ता व मानधन" नियमितपणे  दरमहा व सन्मानपूर्वक मिळेल. ग्रामपंचायतीत नव्याने निवडून आलेल्या सरपंच सदस्यांना ग्रामसेवकांनी "दप्तर हस्तांतरणासह दप्तर ओळख" करुन मिळेल. राज्य शासनाने यशदा व पंचयात प्रशिक्षण केंद्राच्या  मदतीने ग्रामपंचायत लोकप्रतिनिधींसाठी कारभार परिचयाच्या अभ्यासक्रमासोबतच "पंचवार्षिक प्रशिक्षण कॅलेंडर" तयार होईल..

गावातून प्रामाणिक लोकप्रतिनिधी पुढे येऊ लागले तर, त्यांच्या कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम घडेल आणि त्यांच्या प्रेरणेतून जास्त लोकांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात येण्यासाठी रूची निर्माण होईल. परस्परावलंबी, पारदर्शी व लोककेंद्री शासनाचे धोरण यातून प्रतिबिंबित होईल.

लोक व ग्रामपंचायत यांचे नाते बळकट करण्यासाठी ग्रामपंचायत कारभार परिचय धोरणात नव्या तरतुदींचा-धोरणांचा समावेश करण्यात आला आहे. या तरतुदींना धोरणाला कायदेशीर चौकटीत बसविण्याचा मा. राज्य निवडणूक आयोग व ग्रामविकास विभागाने प्रयत्न केला. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ग्रामपंचायत कारभार परिचय धोरणाला मूर्त स्वरुप मिळाले आहे.

आज ग्रामपंचायतस्तरावर लोकप्रतिनिधींना अनेक सेवा व सुविधा उपलब्ध आहेत. राज्य शासनाच्या विविध विभागांनी वेळोवेळी त्यासंदर्भात शासन आदेश निर्गमित केले आहेत. त्यांची एकत्रित सूत्र रुपाने मांडणी यात करण्यात यावी. प्रामुख्याने पुढील तरतुदींचा अंर्तभाव करण्यात यावा निवडणूक जिंकणाऱ्या लोकप्रतिनिधींना प्रमाणपत्र, ग्रामपंचायत सरपंचांना मानधन, ग्रामपंचायत सदस्यांना बैठक भत्ता, सदस्य व सरपंचांना प्रवास खर्च व दैनिक भत्ता, सरपंच ओळखपत्र, ग्रामपंचायत लोकप्रतिनिधी प्रशिक्षण कार्यक्रम, झेंडावंदनाचा अधिकार ग्रामपंचायत पदाधिकारी शिष्टाचार संच, यात ग्रामपंचायतीची मुद्रा, ग्रामपंचायतीचे लेटर हेड, सरपंच, उपसरपंचांना सहीचा अधिकार, संगणकिय सही (DSC), सरपंच व

उपसरपंच पदाचा शिक्का, सरपंच, उपसरपंच आसन व्यवस्था व नावाची पाटी (नेम प्लेट) यांचा अंतर्भाव करण्यात यावा .

ग्रामपंचायतस्तरावर चांगली सुशासन व्यवस्था टिकविण्याची पहिली जबाबदारी निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींची असते. त्यासाठी पंचायतीच्यावतीने ते लोकांना उत्तरदायी असतात. म्हणजे लोकांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यास बांधील असतात. त्याने पंचायतीची निश्चित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी चातुर्याने वागून कार्यक्षमतेने परिणामकारक कामाला महत्व दिले पाहिजे. समाजातील सर्व स्तरातील लोकांशी समतेने वागून समाजात सर्वसमावेशकता वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लोकप्रतिनिधी म्हणून स्वतःचा व पंचायतीचा आर्थिक कारभार पारदर्शक पध्दतीने होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. ग्रामस्थांनी विचारलेल्या प्रत्येक प्रश्नांची उत्तरे आणि सूचनांना प्रतिसाद दिला पाहिजे. सर्वांच्या सहमतीने व सहभागाने पंचायतीच्या विकास कामांना पुढे घेऊन गेले पाहिजे. यासाठी प्रशासकीय मार्गदर्शिका दिशादर्शक म्हणून काम करेल.

ग्रामपंचायतीत निवडून आल्यानंतर आपली पंचायत व्यवस्था कशी आहे. कारभार परिचय धोरणाअंतर्गत लोक व लोकशाही बळकटीकरणाचे स्थानिक कार्यक्रमांची माहिती, लोकशाही सुशासनाअंतर्गत त्यांना मिळालेले अधिकार व सुविधा यांची माहिती तसेच पंचायत कारभाराची ओळख होण्यासाठी काही उपयुक्त शासन आदेश यांचा यात अंर्तभाव असायलाच हवा !

गावाच्या विकास धोरणाचा व योजनांचा, देशाच्या धोरणाशी, योजनांशी व सर्वंकष विकासाशी कोणता व कसा संबंध आहे, आणि त्यातून त्यांची काय कामे असू शकतात, या सर्वांची माहिती हे लोकप्रतिनिधी निवडून आल्यावर लगेच होणे आवश्यक आहे. ही ओळख त्यांना पद्धतशीरपणे, नियोजन करून जर देता आली तर अंधारात चाचपडत काम करण्याची वेळ त्यांच्यावर येणार नाही. अतिशय व्यावसायिक, पद्धतशीर व शिस्तबद्ध रितीने जर गाव प्रश्नांचा अजेंडा राबविला गेला तर, प्रशिक्षित लोकप्रतिनिधींची कौशल्यपूर्ण कामगिरी समोर यायला वेळ लागणार नाही. सर्वसमावेशक असे विकासाचे हे धोरण स्थानिक लोकशाही व्यवस्थेला बळकट करण्यात मोठा हातभार लावील. प्रशासन व शासन हे दोन्ही खांब मजबूत असतील तर गांव प्रश्न सोडवायला नक्की वेग प्राप्त होईल. देशात लोकशाही - गावात हुकुमशाही, चालणार नाही, हे जरी खर असलं तरी, त्यासाठी लोकप्रतिनिधींना हक्काची माहिती निवडणूक झाल्याबरोबर मिळाली पाहिजे. हे झालं तर गावविकासाचा चमत्कार नक्की पहायला मिळेल. आमच्या गावात,आम्ही सरकार -हे जर निट रूजलं तर मंत्रालयातील गर्दीही नक्की कमी होईल.

श्री. भीम रासकर

(पंचयतराज गांव अभ्यासक, संचालक RSCD)